# <u>महाराष्ट्र ॲडव्हेंचर स्पोर्टस सेंटरची स्थापना</u>

**<u>प्रस्तावना</u> -**

**महाराष्ट्र राज्याची भौगोलिक परिस्थिती साहसी क्रीडा प्रकारासाठी पूरक आहे. महाराष्ट्र राज्याला साहसी उपक्रमांकरीता आवश्यक नैसर्गिक घटकांचा समृध्द असा वारसा लाभलेला आहे. यामध्ये 720 किलोमीटरचा समुद्र किनारा, सह्याद्रीच्या पर्वत रांगा, सातपुडा पर्वत ज्यामध्ये 1648 मीटर उंचीचे कळसूबाई शिखर, पाचगणीचे पठार, चिखलदरा, लोणारचे सरोवर, मेळघाट, ताडोबा, नागझिरा इत्यादी महपूर्ण ठिकाणे आहेत. या भौगोलिक विविधतेचा वापर साहसी क्रीडा प्रकारांच्या विकासासाठी करता येणे शक्य आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साहसी क्रीडा प्रकाराला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. या साहसी क्रीडा प्रकारातून महाराष्ट्र राज्यातील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर किर्तिमान स्थापित केलेले आहे.**

**साहसी क्रीडा प्रकारामुळे नेतृत्वगुणांचा विकास, धैर्य, चिकाटी, कल्पकता, साहसी वृत्ती, निसर्गाशी एकरुपता, सकारात्मक विचारसरणी, सांघिक भावना, समन्वय इत्यादी बाबींचा विकास होतो.  विदेशामध्ये साहसी खेळांचा वापर शाळांमध्ये तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये विद्यार्थी व कर्मचा-यांच्या क्षमतांच्या वाढीसाठी केला जातो. आपत्ती व्यवस्थापनासाठी साहसी खेळांची अतिशय गरज आहे व यातील तंत्रे जगभरातील पोलिस दले लष्कर तसेच सर्व निमलष्करी दले शिकतात व याचा वापर करतात.**

**राज्यातील खेळाडूंना या प्रशिक्षणाची सुविधा राज्यात उपलब्ध नसल्याने वंचित रहावे लागते या करीता राज्यात ॲडव्हेंचर_स्पोर्टस् सेंटरची स्थापना करणे आवश्यक आहे.**

  

<u>**प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरचे स्थळ**</u> -

**महाराष्ट्राच्या वायव्येस सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये ब्रम्हगिरीच्या पायथ्याशी , गोदावरी नदीचे काठावर वसलेल्या नाशिक जिल्हयास पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा प्राप्त झालेला आहे. गोदावरी नदीच्या काठावर वसलेले असल्याने व कुंभमेळ्याच्या आयोजनाने नाशिकला धार्मिक महत्व देखील प्राप्त झालेले आहे. पौराणिक कथांनुसार अयोध्येचा राजा रामाने त्याच्या 14 वर्षांच्या वनवास काळात नाशिकला स्वत:चे घर केलेले होते तसेच राजा रामाच्या आदेशानुसारच लक्ष्मणाने शुर्पणखेचे नाक येथेच कापलेले असल्याने या शहराला नाशिक नाव प्रचलित झाल्याची दंतकथा रूढ आहे.**

**भौगोलिक दृष्ट्या विचार केल्यास नाशिक हे शहर दुर्गा, गणेश, चित्र घंटा, पांडव, डिंगरअली, म्हसरुल, जोगवाडा, पठाणपुरा आणि कोकणी या नऊ डोंगरांच्या कुशीत वसलेले असुन भोवताली असलेल्या विविध तलांवामुळे शहराच्या सौंदर्यात अधिकच भर पडलेली आहे.**

**नाशिक जिल्हयात शिवकालिन गड व किल्ले, गोदावरी सारखी मोठी नदी, अनेक मोठी धरणे असल्याने या जिल्हयात साहसी उपक्रमांकरीता उपयुक्त वातावरण निर्माण झालेले आहे.**

त्यामुळे, नाशिक शहरालगत त्र्यंबकेश्वर तालुक्यात अंजनेरी पर्वत (हनुमानाचे जन्मस्थान) शिखराच्या पायथ्याशी नयनरम्य वातावरणात तीन एकर शासकीय जागा ट्रेकिंग सेंटर या प्रयोजनाकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास उपलब्ध झालेली आहे. त्याचबरोबर या जागेच्या शेजारी तालुका क्रीडा संकुलाकरीता तीन एकर जागा उपलब्ध झालेली आहे. या जागेमध्ये राज्याचे ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटर स्थापन करण्याची बाब प्रस्तावित आहे. सदर जागेपासून साधारण 4-5 किमी अंतरावर बॅकवॉटर उपलब्ध असल्याने वॉटर स्पोर्टस उपक्रम आयोजित करणे देखील शक्य होणार आहे.





## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरचे स्वरूप -

**साहसी क्रीडा प्रकार खालीलप्रमाणे तीन भागात विभागल्या जातात-**

1. **जल क्रीडा प्रकार**
2. **वायु क्रीडा प्रकार**
3. **स्थल क्रीडा प्रकार**

**प्रस्तावित केंद्र हे ॲडव्हेंचर स्पोर्टस् क्षेत्रामध्ये नियंत्रण संस्थेच्या रुपाने कार्य करेल. या केंद्राच्या माध्यमातून खालील उपक्रम राबविण्यात येतील -**

- **एरो स्पोर्टस्, वॉटर स्पोर्टस् व माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्टस् ,स्पोर्ट क्लाईंबिंग या सर्व साहसी खेळांच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम कार्यान्वित करणे.**
- **साहसी खेळांच्या सुविधा सेंटरमध्ये विकसित करणे**
- **साहसी क्रीडा व पर्यटन महोत्सव आयोजित करणे व पर्यटनाला चालना देणे.**

- राज्यामध्ये साहसी क्रीडाप्रकारांना चालना देणा-या स्वयंसेवी संस्थाना मान्यता, परवाना देणॆ.
- साहसी क्रीडा स्पर्धांचे आयोजन व नियमन करणॆ.
- नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित करणॆ.
- साहसी खेळांचा प्रसार व प्रचार करणॆ. इ.
- लाईफ सेव्हिंग्ज ( जीवन रक्षक) अभ्यासक्रम राबविणे.
- तरुणांमध्ये साहस विषयी भावना रुजविणे
- सर्वसामान्य युवकांसाठी साहसी क्रीडा प्रकाराच्या सुविधांची उपलब्धता करुन देणे
- आंतरराष्ट्रीय स्तराच्या साहसी स्पर्धांसाठी युवकांना तयार करणे
- छोटया छोटया साहसी पर्यटनाला चालना देणे, साहसी पर्यटनाच्या माध्यमातून युवकांना सेवासंधी उपलब्ध करुन देणे
- पोलीस अग्नीशामक व औद्योगिक व्यवसायांना अतितात्कालिन व आपत्कालीन सेवा देणारी तुकडी तयार करण्यासाठी प्रशिक्षण देणे.





या केंद्राच्या माध्यमातून ॲडव्हेंचर स्पोर्टस या क्रीडा प्रकाराचा प्रचार व प्रसार करण्यात येईल. तसेच सदर क्रीडा प्रकाराशी संबंधित विविध कौशल्यांमध्ये पारंगत होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. हे प्रशिक्षण देण्याकरीता मानधन तत्वावर तज्ञ व्यक्तींना पाचारण करण्यात येईल.

## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरकरीता आवश्यक मुलभूत सुविधा -

1. विविध प्रकारच्या साहसी उपक्रमांचे प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेला अद्ययावत हॉल.
2. साहसी उपक्रमांसाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्याची माहिती तसेच राज्यातील व देशातील पर्यटन व साहसी स्थळांची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी म्युझियम.
3. अद्ययावत लायब्ररी
4. कॅफेटेरीया
5. किमान 150 व्यक्ती बसु शकतील असे सर्व सोईंनी युक्त अद्ययावत ऑडीटोरीयम.
6. अद्ययावत विश्रामगृह
7. किमान 150 व्यक्ती राहू शकतील असे सुसज्ज वसतिगृह
8. क्लाईंबिंग वॉल (आर्टिफिशियल)
9. रिव्हर क्रॉसिंगसाठी आवश्यक सुविधा
10. पॅराग्लायडिंगकरीता आवश्यक सुविधा
11. वॉटर स्पोर्टसकरीता आवश्यक सुविधा

## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरकरीता आवश्यक साहित्य -

- प्रस्तावित सेंटरकरीता आवश्यक साहित्याची यादी सोबत परिशिष्ट अ, ब व क अन्वये जोडली आहे.







## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरकरीता अपेक्षित आर्थिक तरतूद -

- प्रस्तावित केंद्राचे स्थापनेकरीता आवर्ती व अनावर्ती आर्थिक तरतूद आवश्यक आहे. केंद्राचे प्रस्तावित ठिकाणी पर्यटन विभागामार्फत रू.200.00 लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध झालेली आहे.
- उपरोक्त केंद्राकरीता अनावर्ती खर्च म्हणून किमान रू.1000.00 लक्ष इतकी तरतूद आवश्यक आहे. पर्यटन विभागाने केलेल्या तरतूदी व्यतिरिक्त अंदाजे रू.800.00 लक्ष इतकी तरतूद प्राप्त होणे आवश्यक आहे.
- दैनंदिन देखभाल व व्यवस्थापनाकरीता तसेच विविध प्रकारचे अभ्यासक्रम चालविण्याकरीता दरवर्षी आवर्ती स्वरूपात रू.50.00 लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.
- प्रस्तावित केंद्राचे ठिकाणी अपेक्षित पर्यटन, प्रशिक्षण वर्ग व इतर उपक्रमांचे माध्यमातून आवर्ती खर्चाकरीता अपेक्षित खर्चाच्या 50 टक्के तरतूद उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. उर्वरीत 50 टक्के खर्चाची तरतूद ही शासनामार्फत करण्यात यावी असे प्रस्तावित आहे.

## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरकरीता आवश्यक कर्मचारी वर्गाचा आकृतिबंध -

प्रस्तावित केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन पाहण्यासाठी, विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी व सदर केंद्राचे ठिकाणी नियोजित कार्यक्रम सुनियोजित पद्धतीने राबविण्यासाठी क्रीडा विभागामार्फत किमान गट ब दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती / प्रतिनियुक्ती करण्यात यावी. इतर कर्मचारी हे मानधन तत्वावर उपलब्ध करून घेण्यात यावेत.

## प्रस्तावित ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरच्या कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी समिती -

प्रस्तावित सेंटरची स्थापना करून सदर ठिकाणी प्रस्तावित कार्यक्रम राबविण्याकरीता राज्यस्तरावर उच्चस्तर समिती व नाशिक येथे सदर सेंटर प्रस्तावित असल्याने नाशिक जिल्हा स्तरावर दैनंदिन कामकाज समिती खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे -

**प्रस्तावित उच्चस्तर समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| 2 | मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण, महाराष्ट्र राज्य | उपाध्यक्ष |
| 3 | मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| 4 | मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक | सदस्य |
| 5 | मा. आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| 6 | मा.जिल्हाधिकारी, नाशिक | सदस्य |
| 7 | विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग | सदस्य |
| 8 | साहसी क्रीडा प्रकार क्षेत्रातील दोन तज्ञ | सदस्य |
| 9 | जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक | सदस्य सचिव |

**प्रस्तावित दैनंदिन कामकाज समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| 1 | मा.जिल्हाधिकारी, नाशिक | अध्यक्ष |
| 2 | विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग | सदस्य |
| 3 | साहसी क्रीडा प्रकार क्षेत्रातील दोन तज्ञ | सदस्य |
| 4 | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 5 | उपविभागीय अधिकारी, त्र्यंबकेश्वर | सदस्य |
| 6 | जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक | सदस्य |
| 7 | तालुका क्रीडा अधिकारी, त्र्यंबकेश्वर | सदस्य सचिव |